# आम्ही नवउमेदवार...

आम्ही राखणदार... प्रगतशील शहराचे...!
आम्ही स्पंदन तरुणाईचे... आम्ही जीवन उद्याचे
आम्ही स्वप्न जपणारे... आम्ही वेळ पाळणारे...
काल-आज-अन् उद्याही...
ना धर्मवादी, ना जातीयवादी, ना प्रांतवादी,

# आम्ही फक्त लोकहितवादी

हृदयात प्रभाग... भयमुक्त प्रभाग... नजरेसमोर फक्त

# प्रभागाचा विकास...

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी


श्री. गणेश किसनराव पेलमहाले


सौ. वंदना गणेश पेलमहाले

संचालक - सोहम मिसळ
मो. 9881319747

प्रिंट सेंटर - 9766087779

# हो ! आपण हे करु शकतो...
# Yes ! We Can...

## नाशिक महानगरपालिका पंचवार्षिक निवडणूक २०२२

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी




श्री. गणेश किसनराव पेलमहाले सौ. वंदना गणेश पेलमहाले

# * परिचय *

नमस्कार,

मी गणेश किसनराव पेलमहाले मूळ दिंडोरी तालुक्यातील चाचडगाव येथील. आमचा पेलमहाले परिवार हा साधारणपणे १९४५ साली नाशिकच्या पंचवटी येथील जोशी वाडा येथे रोजगारासाठी स्थायिक झाला व गेल्या ४० वर्षांपासून आपल्या म्हसरूळ परिसरात वास्तव्यास आहे. माझा जन्म हा म्हसरूळचाच असल्याने, लहानपणापासून ह्या आपल्या परिसरातील जवळपास सर्वच लोक परिचित आहेतच, शिवाय गेल्या १४ वर्षां पासून आपल्या सगळ्याच्या आवडत्या सोहम मिसळ च्या माध्यमातून आमचा समस्त पेलमहाले परिवार अतिशय प्रामाणिक व मन लावून आपल्या सेवेत आहे. लहानपणापासून स्वाध्याय परिवार व स्वामी समर्थ अध्यात्म केंद्रच्या संस्कारात लहानाचा मोठा झालेला असल्याने सेवाभावी वृत्ती व जबाबदारी ची जाणीव ही त्याच संस्काराचे बाळकडू होते. म्हणून च १० वी नंतर इलेक्ट्रॉनिक्स चा व्होकेशनल कोर्स केल्यावर परिवाराची साधारण आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण अर्ध्यात सोडून ६ महिने STD, PCO मध्ये नंतर ३ वर्ष पंचवटी–मेरी– म्हसरूळ मार्गावर रिक्षा चालक म्हणून व नंतर ७ वर्षे स्वतःच्या ट्रक वर चाऱ्याचा व्यवसाय केला. २००८ पासून आपल्या सोहम मिसळ हा हॉटेल व्यवसाय करत सगळ्याच स्तरातून सामाजिक बांधिलकी जपत म्हसरूळ–मखमलाबाद लिंक रोड येथे अतिशय सुंदर साई बाबा,स्वामी समर्थ व गजानन महाराज आशा तिघांचा मेळ असलेले त्रैमूर्ती दत्तस्वरूप श्री गुरुस्थान साई बाबा मंदिर ची उभारणी केली. ज्यामुळे परिसरात चैतन्यमय वातावरण तयार झाले आहे. तसा आपल्या इथे जास्त करून नोकरदार वर्ग असल्याने दिवसभर घरी फक्त महिलाच असतात, त्यामुळे सोनसाखळी चोरी व घरफोडी च्या घटनांमध्ये वाढ झाल्याने आपल्या संपूर्ण परिसरात ठीक ठिकाणी स्वखर्चातून CCTV Camera लावून परिसर सुरक्षित केला आहे. वाढत्या शहरिकरणासोबत पर्यावरणाचे रक्षण होण्यासाठी परिसरातील नागरिकाच्या वाढदिवसाला वृक्षभेट देऊन वृक्षसंवर्धन मोहीम राबवली, शिवाय गत ५ वर्षांपासून स्वतः धुर फवारणी मशीन घेऊन आपल्या प्रभागात मोफत डेंग्यू– मलेरिया–चिकनगुणिया प्रतिबंधक औषध धुरफवारणी मोहीम राबवत आहे आणि अशातच अचानक संपूर्ण जगासमोर येऊन उभे ठाकलेल्या कोरोनाच्या संकटात अगदी पहिल्या लॉकडाऊन पासून ते आजतागायत स्वखर्चातून कोरोना रोगा संदर्भात जनजागृती असो, लॉकडाऊन काळात पोलिसांच्या मदतिला पोलीस मित्र म्हणून रोज १० तास ड्युटी करणे असो व बेवारस अनाथ रुग्णांना औषधोपचार मिळवून देणे असो, किंवा लसीकरणासाठी नागरिकांची गैरसोय दूर व्हावी म्हणून लसीकरण केंद्र सुरू करणे असो, ऑक्सिजन टंचाईच्या काळात स्वखर्चातून आपण ८ ऑक्सिजन मशीन घेऊन परिसरातील नागरिकांना मोफत वापरण्यासाठी दिले शिवाय प्रत्येक कोरोना पॉझिटिव्ह रुग्णाच्या घरी, इमारतीत मोफत सॅनिटायझेशन करण्यापासून ते आत्ता ७५ हजार मास्क चे वाटप असो नेहमीच परिसराला आपले घर व परिसरातील नागरिकांना आपला परिवार समजून वेळोवेळी मी मदत करतांना प्रामाणिक प्रयत्न केले आहे. परंतु हे सामाजिक काम करत असतांना बऱ्याचदा मर्यादा येतात का तर आपल्याकडे अधिकार नसता म्हणून यासाठीच मी आपल्या सगळ्यांच्या आशीर्वादाने नाशिक महानगरपालिका २०२२ पंचवार्षिक निवडणूक लढवीत आहे. आज पर्यंत जी पण सेवा केली ती आपल्या मायबाप जनतेच्या व थोरामोठ्याच्या चरणी अर्पण करतो व अशीच सेवा अधिक अधिक घडो ह्यासाठी आपल्याकडे संधी च दान मागतो. आपण सर्व नागरिक आजपर्यंत मि केलेल्या कामाचे साक्षीदार आहात, कुठलीही मदत करताना मी कधी कुणाला कुठल्या जातीचा,धर्माचा किंवा कुठल्या पंथाचा आहे हे बघितले नाही. केवळ माणसाला माणूस म्हणून बघितले आणि प्रत्येक काम प्रामाणिकपणे केले, आता वेळ तुमची आहे लोकप्रतिनिधी निवडतांना काम करणाऱ्या व्यक्तीला संधी द्या इतकीच अभिलाषा धन्यवाद !

# आपली मिसळ सोहम मिसळ

## १० ऑक्टोबर — आश्विन / कार्तिक शके १९४४ — २०२२

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| रविवार | ३० | २ | ९ | १६ | २३ |
| सोमवार | ३१ | ३ | १० | १७ | २४ |
| मंगळवार | | ४ | ११ | १८ | २५ |
| बुधवार | | ५ | १२ | १९ | २६ |
| गुरुवार | | ६ | १३ | २० | २७ |
| शुक्रवार | | ७ | १४ | २१ | २८ |
| शनिवार | १ | ८ | १५ | २२ | २९ |






## ११ नोव्हेंबर — कार्तिक / मार्गशीर्ष शके १९४४ — २०२२

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| रविवार | | ६ | १३ | २० | २७ |
| सोमवार | | ७ | १४ | २१ | २८ |
| मंगळवार | १ | ८ | १५ | २२ | २९ |
| बुधवार | २ | ९ | १६ | २३ | ३० |
| गुरुवार | ३ | १० | १७ | २४ | |
| शुक्रवार | ४ | ११ | १८ | २५ | |
| शनिवार | ५ | १२ | १९ | २६ | |



## १२ डिसेंबर — मार्गशीर्ष / पौष शके १९४४ — २०२२

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| रविवार | | ४ | ११ | १८ | २५ |
| सोमवार | | ५ | १२ | १९ | २६ |
| मंगळवार | | ६ | १३ | २० | २७ |
| बुधवार | | ७ | १४ | २१ | २८ |
| गुरुवार | १ | ८ | १५ | २२ | २९ |
| शुक्रवार | २ | ९ | १६ | २३ | ३० |
| शनिवार | ३ | १० | १७ | २४ | ३१ |



# आपली मिसळ सोहम मिसळ





# म्हसरूळला पर्यावरण दिनानिमित्त 'वृक्ष लावा... वृक्ष जगवा' उपक्रमास प्रारंभ

। म्हसरूळ । प्रतिनिधी ।

म्हसरूळला सामाजिक कार्यकर्ते गणेश पेलमहाले यांच्या संकल्पनेतून पर्यावरण दिननिमित्त म्हसरूळ भागातील सर्व स्तरातील जेष्ठ व्यक्तींच्या वाढदिवस दिवशी 'झाडे लावा..झाडे जगवा.. अन् पर्यावरण वाचवा..!' या सुविचारानुसार सुंदर,शीतल म्हसरूळ व परिसरासाठी वृक्ष संवर्धन जनजागृती उपक्रमाला प्रारंभ करण्यात आला.

मनपा प्रभाग एक तथा म्हसरूळमध्ये पर्यावरण दिन निमित्ताने म्हसरूळ भागात सामाजिक कार्यकर्ते गणेश पेलमहाले यांच्यावतीने आयोजित



वृक्षसंवर्धन मोहिमे अंतर्गत सर्व जेष्ठ नागरिक व युवकांच्या वाढदिवसदिनी त्यांना वृक्षरोप देऊन सत्कार करण्यात आला.व वृक्ष संवर्धनात सहभागी करून घेण्यात आले. यापुढे वृक्ष संवर्धन जनजागृती मोहिम अंतर्गत म्हसरूळ भागात वृक्ष प्रेमींचा वाढदिवस वृक्ष रोपांचं लागवडीनेच करण्यात येईल.असे श्री.पेलमहाले यांनी सांगितले. तर 'वृक्ष लावा..व वृक्ष जगवा..पर्यावरण राखा..ही एक जनजागृती आहे...प्रयत्न करा बदल नक्की घडेल..! यासाठी सर्वांनी वृक्ष संवर्धनात सहभागी होऊ या..अन् पर्यावरण राखू या..असेही यावेळी बोलतांना सत्कारार्थी प्रकाश उखाडे यांनी व्यक्त केले.शेवटी उपस्थितांचे महेंद्र हिरे यांनी आभार मानले.

## वृक्षलागवडीतून वाढदिवस

पंचवटी : म्हसरूळ येथे सामाजिक कार्यकर्ते गणेश पेलमहाले यांच्या संकल्पनेतून म्हसरूळ भागातील सर्व स्तरातील ज्येष्ठ व्यक्तींचा वाढदिवस 'झाडे लावा, झाडे जगवा अन् पर्यावरण वाचवा..!' या उपक्रमानुसार साजरा करण्यात आला. म्हसरूळ व परिसरात वृक्षसंवर्धन जनजागृती उपक्रमाला प्रारंभ करण्यात आला. वृक्ष संवर्धनात सहभागी करून घेण्यात आले. यापुढे वृक्षसंवर्धन जनजागृती मोहिमेंतर्गत म्हसरूळ भागात वृक्षप्रेमींचा वाढदिवस रोपांच्या लागवडीनेच करण्यात येईल, असे पेलमहाले यांनी सांगितले.





**जन्मदिनी वृक्षभेट देऊन वृक्षसंवर्धन जनजागृती**



## हो ! आपण हे केलं आहे.

आपल्या मेरी–म्हसरूळ–बोरगड परिसर हरित, सुंदर व निसर्गरम्य राहवा ह्यासाठी आपल्या परिसरातील ५००१ नागरिकांना वृक्षभेट देऊन त्यांचा वाढदिवस साजरा करुन वृक्षसंवर्धनासाठी जनजागृती केली ज्या करिता मला महाराष्ट्र शासनाचा हरितसेनेचा पुरस्कार मिळाला असुन परिसरात वृक्षसंवर्धनाला चालना मिळाली आहे.

पुढारी

# प्रभागात स्वखर्चाने धूर फवारणी

## डेंग्यू–मलेरियाच्या उच्चाटनाचा सामाजिक कार्यकर्त्याचा निर्धार

**म्हसरूळ : वार्ताहर**

सध्या शहरात सर्वत्र डेंग्यू, मलेरियाचे रुग्ण आढळत आहेत. त्यासाठी महापालिकेकडून डास प्रतिबंधक धूर फवारणी केली जाते, मात्र ती पुरेशी नाही. यावर उपाय म्हणून म्हसरूळ येथील एका सामाजिक कार्यकर्त्याने थेट हे धूर फवारणी यंत्रच खरेदी करून परिसरात धूर फवारणी केली जात आहे.

प्रभाग १ मधील म्हसरूळ गाव व कॉलनी परिसरात डास प्रतिबंधासाठी महापालिकेच्या भरवशावर न राहता गणेश पेलमहाले यांनी खासगी स्वरूपात धूर फवारणी यंत्र खरेदी केले आहे. या डासप्रतिबंधक फवारणी अभियानाचा शुभारंभ म्हसरूळ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संजय सांगळे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष रंजन ठाकरे, माजी नगरसेवक वसंत मोराडे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी गणेश पेलमहाले म्हणाले की, लोकसेवा भावनेतून स्वखर्चाने हा उपक्रम राबवत आहे. नागरिकांच्या मागणीनुसार सोसायटी, कॉलनीत धूर फवारणी करून देण्यात येईल. ही सेवा मोफत आहे. आपला प्रभाग डेंग्यू व मलेरियामुक्त व्हावा, यासाठी ही धडपड आहे. बसस्थानकासमोरील महालक्ष्मी देवी मंदिर रोडवरील साईबाबा मंदिराजवळील कार्यालयात जाऊन नागरिक मोफत धूर फवारणीची सुविधा घेत आहेत. मानवाधिकार कार्यकर्ते सुनील परदेशी यांनीही मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी अंजली कुलकर्णी, रोहिणी दळवी, भारती माळी, गणेश पाटील, दीपक मोराडे, कैलास मोराडे, तुकाराम बोरस्ते आदी उपस्थित होते. या उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक केले जात आहे.



**म्हसरूळ : सोहम सुरक्षा योजनेंतर्गत धूर फवारणी करताना कार्यकर्ते.**
(छाया : सुधीर पेठकर)




## हो ! आपण हे केलं आहे.

गेल्या ५ वर्षांपासून डेंग्यु–मलेरिया व चिकनगुणिया ह्या सारख्या रोगांवर प्रतिबंध व्हावा यासाठी ३० हजार व १० हजार रुपयांचे धुरफवारणी मशीन विकत घेतले असून माझ्याकडून आज देखील नियमित डेंग्यु–मलेरिया प्रतिबंध धुरफवारणी मोहीम सुरु आहे.



# आपली मिसळ सोहम मिसळ



# आपली मिसळ सोहम मिसळ



पुढारी

## म्हसरूळला शेतकऱ्यांचा सत्कार

**म्हसरूळ :** ऑल इंडिया अॅण्टी करप्शन बोर्ड व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय शेतकरी दिनी येथील शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. वरवंडी रोडवरील देशमुख मळ्यात, शेणखत तसेच सेंद्रिय पद्धतीने भाजीपाला तसेच कडधान्ये, द्राक्ष बाग आदी पिके घेतली जातात. त्यांनी पूर्वीची शेती करण्याची पद्धत पुन्हा अंमलात आणणे गरजेचे आहे, असे सांगितले. यावेळी शेती करणारे जाधव कुटुंबातील सदस्यांचा सत्कार करण्यात आला. कामिनी भानुवंशे यांच्या पेरूच्या बागेत जाऊन डॉ. भानुवंशे व इतरांचा सत्कार करण्यात आला. ऑल इंडिया अॅण्टी करप्शन बोर्डचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सुनील परदेशी, शहर अध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर संघटक गणेश पेलमहाले, शहर महिला अध्यक्षा संजना पगार, शीतल चंदात्रे, स्नेहल ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या पंचवटी विभागीय महिला अध्यक्ष सरिता पगारे, सविता सिंह, विकास जाधव, महेंद्र हिरे, पंकज भानुवंशे आदी उपस्थित होते.



म्हसरूळ : राष्ट्रीय शेतकरीदिनी बळीराजाचा सत्कार करताना कार्यकर्ते.

पुढारी

## संसाराचा गाडा ओढणाऱ्या कर्तबगार महिलांचा सत्कार

**म्हसरूळ : वार्ताहर**

येथील विविध क्षेत्रांतील सामाजिक कार्यकर्त्यांनी एकत्रित येऊन स्त्री शक्तीचा सन्मान केला. यामध्ये संसाराचा गाडा ओढताना कुटुंबाला हातभार लावणाऱ्या अशा महिलांचा सत्कार करण्यात आला. संसाराचा गाडा ओढून मानसन्मानाने जगणाऱ्या महिलांचा त्यांच्या घरी व कामाच्या ठिकाणावर जाऊन सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. सुनील परदेशी, गणेश पेलमहाले आदींनी या उपक्रमाचे आयोजन केले होते. प्रवीण शाह, बाळासाहेब सूर्यवंशी, सुभाष सूर्यवंशी यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

**सत्कारार्थी असे...**

महिला स्कूल बसचालक कल्पना पवार, अनिता शिरसाठ, अरुणा कांबळे, हिरा महाले, वंदना जाधव, पुष्पा नागरे, सुनीता सावंत, लता गांगुर्डे, बिजला भरस्कर, कविता नारोळे, सुरेखा गांगुर्डे, कल्पना जोपळे, गंगू बैसोर, सारिका सूर्यवंशी, मनीषा काकळीज, रितिका दुबे, सोनाली सोनवणे, चंदा गांगुर्डे, प्रीतम क्षीरसागर आदी महिलांचा समावेश आहे.



म्हसरूळ : महिला कामगारांचा सत्कार करताना सामाजिक कार्यकर्ते. (छाया : सुधीर पेठकर)



म्हसरूळ : मोफत अपघात विमा वाटपप्रसंगी मान्यवर व लाभार्थी.

## म्हसरूळला मोफत अपघात विमा वाटप

**म्हसरूळ :** दत्तजन्मोत्सवानिमित्त प्रसादवाटप व शरदचंद्र पवार यांच्या वाढदिवसानिमित्त प्रभाग १ मधील शेतकरी, कष्टकरी, स्वयंरोजगारीत महिला अशा ८० नागरिकांना प्रत्येकी एक लाख रुपयांचा मोफत अपघाती विमा देण्याचा कार्यक्रम येथे झाला. राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर संघटक गणेश पेलमहाले यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. नाशिक शहराध्यक्ष रंजन ठाकरे यांच्या उपस्थितीत विमा वाटप करण्यात आले. याप्रसंगी सुनील परदेशी, सरिता पगारे, महेंद्र हिरे, शंतनू घुगे, भावनेश राऊत, प्रवीण पुजारी, सोमनाथ विघे आदी सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

## म्हसरूळला महिलादिनी नारीशक्तीचा सन्मान

। म्हसरूळ । वार्ताहर । येथील सामाजिक कार्यकर्ते तथा ऑल इंडिया एंटी करप्शन बोर्डचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सुनील परदेशी व राष्ट्रीवादी काँग्रेस पक्षाचे शहर संघटक व ऑल इंडिया एंटी करप्शन बोर्डचे नाशिक शहर अध्यक्ष (युथ) गणेश पेलमहाले यांच्यावतीने जागतिक महिला दिन निमित्ताने म्हसरूळ भागातील होतकरू महिलांचा सन्मान स्त्री शक्तीचा या पुरस्काराने गौरविण्यात आले.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून म्हसरूळ परिसरातील अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून आपल्या स्वतःच्या पायावर आपल्या संसाराचा गाडा ओढून मानसन्मानाने जगण्याचा प्रयत्न करणाऱ्या अशाच कर्तबगार व स्वावलंबी महिलांना सन्मानपत्र,मिठाई व पुष्पगुच्छ देऊन सन्मान स्त्री शक्तीचा या पुरस्काराने गौरविण्यात आले.



यावेळी सन्मानार्थी महिलांमध्ये प्रामुख्याने अनिता उत्तम शिरसाठ,अरुणा रमेश कांबळे,हिरा कैलास महाले,वंदना जाधव,पुष्पा नागरे,बेदाणा शेख,सुनीता सावंत,लता गांगुर्डे, बीजला भरस्कार,कविता नारोळे,सुरेखागांगुर्डे,कल्पनाजोपळे,-गंगू बैसोर,सारिका सुर्यवंशी,हिरा जाधव,जयश्री मोरे,अर्चना चव्हाण,कल्पना अहिरे,संगीता शिरसाठ,भारती कांबळे,अंजली जैस्वाल,संगीता सूर्यवंशी,मनीषा काकळीज,रितिका दुबे,सोनाली सोनवणे,चंदा गांगुर्डे,प्रीतम क्षीरसागर,ज्योती जाधव,वैशाली मोरे,मंजू सहाणे,मनीषा चौधरी,मीनाक्षी खैरनार,अश्विनी गोसावी,योगिता परदेशी,रुपाली परदेशी,सुमन चौधरी,मीना गायकवाड,सीमा पगारे-,भारती जैस्वाल,सुवर्णा सैदाने यांना गौरविण्यात आले. याशिवाय म्हसरूळ-बोरगड परिसरातील प्रथम कर्तबगार महिला स्कूल बसचालक-सौ.कल्पना अशोक पवार यांनाही गौरविण्यात आले.याप्रसंगी प्रविण शहा,बाळासाहेब सुर्यवंशी,सुभाष सुर्यवंशी यांचे परिसरातील गरजूवंत महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे सहकार्य लाभले.व त्यांना मानसन्मान करण्यासाठी आयोजक सामाजिक कार्यकर्ते गणेश पेलमहाले व सुनिल परदेशी यांनी महिलांचा त्यांच्या कामकाजाच्या ठिकाणी जाऊनच त्यांचा सन्मान केल्याबद्दल उपस्थित सर्व महिला व कर्मचारी तसेच परिसरातील नागरिकांनी त्यांचे आभार मानले.

## हो ! आपण हे केलं आहे.

आपल्या परिसरातील कष्टकरी शेतकरी व होतकरू महिलांचा सन्मान करून, दुध वाटप, वृत्तपत्र वाटप, करणारे भाजी विक्रेते स्कुल व्हॅन, रिक्षा चालक, पत्रकार आशा एकूण ८० नागरिकांना ८० लाख रुपयांचा प्रत्येकी १ लाख रु. याप्रमाणे मोफत अपघाती विमा वाटप करून त्यांच्या मेहनतीला व जिद्दीला प्रोत्साहित केले.



पुढारी

महामारीतील संकटमोचक

# साडेपाच हजार घरांमध्ये केली जंतुनाशक फवारणी

## कोरोना काळात घेतले वाहून : पेलमहाले यांच्या कामाने अनेक कुटुंबे सुरक्षित

**म्हसरूळ : सुधीर पेठकर**

येथील गाव-कॉलनी परिसराची लोकसंख्या ५० हजारांहून अधिक आहे. कोरोनाचे संकट या सर्वांवर आहे. लोक जेथे दुसऱ्याशी बोलताना दचकायचे, तेथे एक व्यक्ती अक्षरशः घराघरांत जातोय. अगदी तेथे कोरोना रुग्ण असला तरीही घराचा परिसर फवारणी करून व्हायरसचा नाश करतो. गरजूला किराणा मालाचे किट मिळते. आठवडाभर पुरेल एवढा भाजीपाला गृहिणीच्या हातात दिला जातोय. हे सर्व स्वखर्चाने. कोरोनाच्या दुसऱ्या तीव्र लाटेत तर ऑक्सिजन कमतरतेने भल्याभल्यांची दाणादाण उडाली. तब्बल ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर स्वतः विकत घेऊन कोरोनाबाधितांना दिले. अशा या कोविड योद्ध्याचे नाव गणेश पेलमहाले.

म्हसरूळ : बेवारस कोरोनाबाधितांसाठी वैद्यकीय पथकासह घटनास्थळी पोहोचलेले गणेश पेलमहाले.

### पोलिस अधिकाऱ्याची ड्यूटी

पेलमहाले यांनी म्हसरूळ ठाण्यातंर्गत विशेष पोलिस अधिकारी म्हणून परिसरात सुमारे पाच महिने काम पाहिले. या काळात नागरिकांना विनाकारण फिरताना पाहून ते व्यथित झाले. विशेष म्हणजे हे सर्व लोक ओळखीचेच होते. पण, त्यांना कोणतीही भीड न ठेवता समज दिली. समजावून सांगितले. त्याचा सकारात्मक परिणाम झाला.

### ऑक्सिजन यंत्राने फुंकले प्राण

सध्या सर्वत्र ऑक्सिजनची कमतरता आहे. त्या अभावी अनेकांनी आपले प्राणही गमावले आहेत. काळाची पावले ओळखून गणेश यांनी पाच ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर स्वतः खरेदी केले. त्याची किंमत दोन लाख रुपये. हे यंत्र देताना कुठेही वशिलेबाजी ठेवली नाही. ते गरजूंची वैद्यकीय माहिती घेऊनच प्राधान्यक्रमाने पोहोचवत आहेत. त्यामुळे अगदी गंभीर रुग्णाच्या जीवात जीव आला आहे. ही धडपड पाहून लोकही गणेश यांच्या कार्यात सहभागी होत आहेत. ही यंत्रे अधिक खरेदी करण्यासाठी श्याम कुलकर्णी (वृंदावननगर) यांनी ५ हजार रुपये, तर रवींद्र चौरे (आरटीओ ऑफिस) यांनी १० हजार रुपयांची मदत गणेश यांच्याकडे सुपूर्द केली आहे.

### ५५० घरांतील व्हायरसचा नाश

या महामारीत एरवी निरोगी माणसाशी बोलायला जीव धजावत नाही, तेथे सामान्य तसेच कोरोनाबाधित रुग्णांच्या घरी भेट द्यायची व सोडियम हायपोक्लोराइड फवारायचे. असे म्हसरूळमधील एक, दोन नव्हे तर तब्बल ५५० घरांचे निर्जंतुकीकरण केले. यासाठीचा खर्च आपल्या खिशातूनच केला. विशेष म्हणजे स्वतः फवारणी यंत्र चालवत आहे.

### कोरोनाबाधितांचा वाचवला जीव

गणी रस्त्याच्या कडेला मरणासन्न अवस्थेतील तीन कोरोनाबाधितांना उचलून रुग्णालयात पोहोचविले. त्यातील दोन जण वाचले. सुरत येथील कोरोनाबाधिताने सुखरूप घर गाठल्यानंतर व्हिडिओ कॉल केला. त्यावरून त्याने पत्नी व मुलांची ओळख करून दिली. त्यांच्याकडे या मदतीबद्दल शब्द नव्हते. पण, नजरेत परमेश्वराची भेट घेतल्याचे भाव होते.





# कोरोना काळात मोफत ऑक्सीजन सेवा

## हो ! आपण हे केलं आहे.

कारोनाच्या दुसऱ्या लाटे दरम्यान निर्माण झालेली ऑक्सिजन ची कमतरता लक्षात घेता आपण स्वखर्चातून ७ व लोकवर्गणीतून १ असे एकूण ८ ऑक्सिजन मशीन विकत घेतले असून ते मोफत कोरोना रुग्णांना वापरण्यासाठी दिले आज तगायत ही सेवा मोफत चालू असून ४७५ नागरिकांना ह्या सेवेचा लाभ झाला.



# H.C.G मानवता कॅन्सर सेंटर व सोहम मिसळ

ह्यांच्या संयुक्त विद्यमाने

# विशेष लसीकरण मोहीम



वार- रविवार दि.११ जुलै २०२१ रोजी
सकाळी ९.०० ते सायं. ५.०० वा
ठिकाण :- सोहम मिसळ,म्हसरुळ-मखमलाबाद
लिंक रोड,म्हसरुळ नाशिक - ४

Call : 9881319747

श्री.गणेश कि. पेलमहाले



सौ.वंदना ग.पेलमहाले



# लसीकरण केंद्राची सुविधा





AADHAAR

# नागरिकांसाठी आधार दुरुस्ती केंद्र

## हो ! आपण हे केलं आहे.

परिसरातील नागरिकांची आधार केंद्र व कारोना लसीकरणाची गैरसोय बघता आपण आधार दुरुस्ती केंद्र नियमित सुरु करून, कोराना प्रतिबंध लसीकरण केंद्र चालू केले, ज्या माध्यमातून १२३५ नागरिकांचे लसीकरण झाले आहे. लवकरच लहान मुलांचे लसीकरण सुरु होत आहे.